# गुरुमाई चिद्विलासानंद यांचा जन्मदिवस २०१९च्याप्रीत्यर्थ विश्वशांतीसाठी प्रार्थना आणि मंगल कामना

गुरुमाईंच्या जन्मदिवसाच्या प्रसंगी त्यांची अशी इच्छा आहे की, आपण सर्वांनी विश्वशांतीसाठी एक प्रार्थना व मंगल कामना अर्पण करावी.

गुरुमाईंनी आपल्याला प्रकाशाच्या तीन रूपांविषयी शिकवले आहे : सूर्य, चंद्र आणि अग्नी. अग्नीच्या माध्यमातून पृथ्वीचा आकाशाशी संपर्क स्थापित होतो.

गुरुमाईंनी आपल्याला हेदेखील शिकवले आहे की, कशा प्रकारे आपण अग्नीसमक्ष आदराने, श्रद्धेने आणि भक्तिभावाने जावे. आपण जेव्हा अग्नीची पूजा करतो, तेव्हा आपण प्रकाशाच्या या तीन रूपांना आपल्या प्रार्थना अर्पित अर्पण करत असतो. आपण या ब्रह्मांडाच्या प्रकाशाचा, हृदयाच्या प्रकाशाचा सन्मान करतो. आणि अग्नीपासून उत्पन्न होणारा धूर आपल्या प्रार्थनांना जेव्हा स्वर्गापर्यंत घेऊन जातो, तेव्हा आपल्या प्रार्थना ऐकून घेतल्या जातात.

जी प्रार्थना आणि मंगल कामना आपल्याला अर्पण करायची आहे, तिची निवड श्रीगुरुमाईंनी केली आहे आणि ही वेदांतील तसेच उपनिषदांतील आहे.

श्रीगुरुमाई म्हणतात, “कृपेचा प्रकाश हा शांतीच्या प्रकाशाचे अनुसरण करतो. शांतीचा प्रकाश हा कृपेच्या प्रकाशाचे अनुसरण करतो.

ॐ.

हे ईश्वरा, आम्ही असत्याकडून सत्याकडे गमन करावे.
अज्ञानाच्या अंधकाराकडून आम्ही ज्ञानाच्या प्रकाशाकडे वाटचाल करावी.
आम्ही मृत्युकडून अमरत्वाकडे,
अस्थायित्वाकडून शाश्वततेकडे जावे.

ॐ.

पारलौकिक आकाशात शांती चमचमत राहावी.
अंतरिक्षात म्हणजेच वरील आकाश व खालील पृथ्वी यांच्यामधील अवकाशात शांती झगमगत राहावी.
संपूर्ण पृथ्वी तसेच तिची जलाशये शांतीच्या प्रकाशाने व्याप्त होवोत.
समस्त रोपट्यांमधून व वृक्षांमधून,
समस्त फळांमधून व फुलांमधून
समस्त आरोग्यदायी वनस्पतींमधून आणि पोषक अन्नपदार्थांमधून शांती प्रसारित होवो.

चिति ज्यामध्ये सतत प्रवाहित होते आहे,
अशा या अनंत ब्रह्मांडाची काळजी वाहणाऱ्या
समस्त दिव्यात्म्यांना,
समस्त देवी-देवतांना शांती प्राप्त व्हावी.
आणि परब्रह्माचा शांतीमध्ये वास असावा.

सर्व स्थानांमध्ये,
सर्वकाळांमध्ये
सर्व मनुष्यांमध्ये,
आणि या समस्त चराचर जगतात
शांतीचा वास असो.

केवळ शांतीच शांती असो,
अंतरात शांती

आणि बाहेरही शांती.
दुसरे काहीही नाही
केवळ शांतीच असो.

शांती सदैव वृद्धिंगत होत राहो—
ती सदैव चमकत राहो —
आपल्या जीवनात आणि आपल्या जगतात.

*ॐ शान्तिः।* समस्त दैहिक व मानसिक दुःखांपासून निवृत्ती होवो.

*ॐ शान्तिः।* तत्त्वे, निसर्ग, हे भौतिक जगत यांपासून आणि या जगतात वसणाऱ्या प्राण्यांपासून उत्पन्न होणाऱ्या दुःखांपासून निवृत्ती होवो.

*ॐ शान्तिः।* देवी-देवता, पारलौकिक आत्मे यांपासून आणि अन्य आत्म्यांपासून उत्पन्न होणाऱ्या दुःखांपासून निवृत्ती होवो.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

या प्रार्थना ह्या ग्रंथांमधून उद्धृत आहेत :
*बृहदारण्यकोपनिषद्* १.३.२८. इंग्रजी भाषांतर © २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन द्वारे.
*यजुर्वेद* ३६.१७. इंग्रजी भाषांतर © २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन द्वारे.